नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ४ । वर्ष : ४ थे । अंक : २४१। किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे    POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शुक्रवार दि. १४ ऑगस्ट २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## राहुल गांधी यांची सर्वोच्च न्यायालयात धाव

नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या एका आदेशाविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. उच्च न्यायालयाने सीबीआय आणि ईडी यांना त्यांच्याविरोधातील उत्पन्नापेक्षा जास्त म



ालमत्तेच्या तक्रारीची चौकशी करण्याचे निर्देश दिले होते. या निर्णयाला आव्हान देण्यासोबतच, हे संपूर्ण प्रकरण अलाहाबाद उच्च न्यायालयाकडून दिल्ली उच्च न्यायालयाकडे वर्ग करावे, अशी स्वतंत्र मागणीही त्यांनी याचिकेत केली आहे.

कर्नाटकातील भाजप कार्यकर्ते विघ्नेश शिशिर यांनी राहुल गांधींकडे घोषित उत्पन्नापेक्षा अधिक मालमत्ता असल्याचा आरोप करत तक्रार दाखल केली होती. या प्रकरणाची दखल घेत उच्च न्यायालयाने मे महिन्यात सीबीआय आणि ईडीला आरोपांची पडताळणी करण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर सुनावणीदरम्यान उच्च न्यायालयाने सीबीआयच्या प्रतिज्ञापत्रावर तीव्र असंतोष व्यक्त केला होता, तर ईडीने योग्य ती पावले उचलल्याचे मान्य केले होते. या प्रकरणाची अलाहाबाद उच्च न्यायालयात २० ऑगस्ट रोजी सुनावणी होणार आहे. दरम्यान, राहुल गांधींनी ७ ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयात दोन स्वतंत्र याचिका दाखल केल्या आहेत. या दोन्ही याचिकांवर १७ ऑगस्ट रोजी भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या विशेष खंडपीठासमोर सुनावणी होणार आहे. उच्च न्यायालयाचा आदेश रद्द ठरवण्याबाबत आणि खटला दिल्ली उच्च न्यायालयात स्थानांतरित करण्याबाबत सर्वोच्च न्यायालय काय निर्णय घेणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# मुंबईच्या कनेक्टिव्हिटीला नवी चालना!

## मेट्रो, लिंक रोड आणि ट्विन टनेल प्रकल्पांना नवी गती

मुंबई (समर्थ गांवकरी)

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) विविध प्रकल्पांचे लोकार्पण, शुभारंभ आणि नामकरण करण्यात आले. यात सांताक्रूझ चेंबूर लिंक रोड–टप्पा– २चे लोकार्पण, मेट्रो मार्गिका २–ब (टप्पा–१अ) अंतर्गत चेंबूर मेट्रो स्थानकाचे लोकार्पण, ठाणे ते बोरिवली दुहेरी बोगदा रस्ता प्रकल्पातील अर्जुना ढ्ढच् चे लॉन्चिंग आणि माजी मुख्यमंत्री 'बॅ. बाबासाहेब अनंतराव भोसले उड्डाणपूल'– बीकेसी कनेक्टरचे नामकरण करण्यात आले.

वांद्रे–कुर्ला संकुल (बीकेसी) परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी एमएमआरडीएच्या माध्यमातून विविध लिंक रोडचे काम हाती घेण्यात आले आहे. भारत नगर रोड ते अकोला जंक्शन एससीएलआरच्या दुसऱ्या टप्प्यामुळे बीकेसीकडे जाणारी वाहतूक अधिक सुरळीत होऊन नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. या मार्गावरील उर्वरित वाहतूक कोंडीचे ठिकाण दूर करण्यासाठीही महापालिका आणि एमएमआरडीएने वेगाने काम करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुंबईतील मेट्रो नेटवर्कच्या विस्ताराबाबत बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, यावर्षी ६० ते ७० किलोमीटर मेट्रो मार्गिका सुरू होण्याचा अंदाज आहे. मेट्रो आणि उपनगरीय रेल्वेचे एकत्रीकरण झाल्यानंतर सुमारे ९० लाख रेल्वे प्रवाशांसह अतिरिक्त ७० लाख प्रवाशांसाठी मेट्रोचे नेटवर्क उपलब्ध होणार आहे. यामुळे लाखो प्रवाशांना अधिक सक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उपलब्ध होईल. केंद्र सरकारच्या निर्णयामुळे २०२७ पासून वातानुकूलित, स्वयंचलित आणि आधुनिक लोकल ट्रेनच्या निर्मितीलाही



गती मिळणार आहे. नियोजनानुसार २०२९ अखेर किंवा मार्च २०३० पर्यंत मुंबईच्या लोकल सेवेत आधुनिक गाड्या दाखल होतील.

ठाणे–बोरीवली ट्विन टनेल प्रकल्पामुळे मुंबईच्या पूर्व–पश्चिम कनेक्टिव्हिटीला मोठी चालना मिळणार आहे. ठाणे ते बोरिवली हे २३ किलोमीटरचे अंतर ११ किलोमीटरवर येणार असून, प्रवासाचा वेळ ९० मिनिटांवरून अवघ्या १२ ते १५ मिनिटांपर्यंत कमी होण्याची अपेक्षा आहे. या प्रकल्पातील दुसऱ्या टीबीएम 'अर्जुना'चे उदघाटन करण्यात आले असून, या दोन्ही बोगद्यांचे काम समांतरपणे सुरू होणार आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

वांद्रे–कुर्ला संकुलातील जी–ब्लॉक ते पूर्व द्रुतगती मार्गाला जोडणाऱ्या एलिव्हेटेड कनेक्टरला राज्याचे तत्कालीन माजी मुख्यमंत्री स्व. बॅरिस्टर बाबासाहेब भोसले यांचे नाव देण्यात आले. स्वातंत्र्यसंग्रामातील योगदान, मुलींच्या शिक्षणासाठी घेतलेले निर्णय, छत्रपती संभाजीनगर येथील औरंगाबाद खंडपीठाची निर्मिती आणि गडचिरोली जिल्ह्याच्या निर्मितीसह राज्याच्या जडणघडणीत त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

## प्रवासी वाहनचालकांना मराठी शिकण्यास आणखी एका महिन्याची मुदत

मुंबई : राज्यातील रिक्षा, टॅक्सी आणि पवर चालणाऱ्या कॅबच्या अमराठी चालकांना मराठी भाषेचे प्राथमिक व व्यावहारिक ज्ञान आत्मसात करण्यासाठी राज्य शासनाने आणखी एका महिन्याची मुदत दिली आहे. तपासणीदरम्यान मराठीचे ज्ञान नसल्याचे आढळल्यास चालकाला ही एक महिन्याची सवलत दिली जाईल; मात्र या मुदतीत भाषा न शिकल्यास परवाना तीन महिन्यांसाठी निलंबित केला जाणार आहे. नव्या नियम ंनुसार ही अट चालकांसाठीच नव्हे, तर वाहन परवानाधारकांसाठीही (परमिटधारक) लागू असेल. इलेक्ट्रॉनिक व विद्युत मीटर असलेल्या टॅक्सींच्या परवान्याचे नूतनीकरण करताना मालकाला मराठीचे ज्ञान असल्याचे प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे सिद्ध करावे लागेल. नियमांचे सतत उल्लंघन केल्यास चालकाला बाजू मांडण्याची संधी देऊन परवाना रद्द करण्याची कारवाई केली जाईल. दरम्यान, राज्यभरात मराठी भाषा प्रशिक्षण वर्गांना प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. कोकण मराठी साहित्य परिषदेच्या सहकार्याने राज्यातील ३२ जिल्ह्यांमधील १४० हून अधिक केंद्रांवर हे वर्ग सुरू असून, सुमारे एक लाखांहून अधिक चालकांचे प्रशिक्षण अंतिम टप्प्यात आले आहे. यामध्ये मुंबई आणि महानगर क्षेत्रातून सर्वाधिक प्रतिसाद लाभला आहे.

## 'एसटी'च्या 'एनसीएमसी स्मार्टकार्ड'साठी १ कोटींहून अधिक प्रवाशांची नोंदणी : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

मुंबई (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) प्रवाशांना अधिक सुलभ, सुरक्षित आणि डिजिटल प्रवासाचा अनुभव देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या एनसीएमसी स्मार्ट कार्डला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. १२ ऑगस्टपर्यंत राज्यात तब्बल १ कोटी १ लाख ७३ हजार ८३८ प्रवाशांनी एनसीएमसी स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली असून, त्यापैकी ६४ लाख ९१ हजार ६५ कार्डे सक्रिय झाली आहेत, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

एनसीएमसी स्मार्ट कार्डच्या माध्यमातून एसटी प्रवासातील तिकीट व्यवहार अधिक सुलभ आणि कॅशलेस करण्याच्या दिशेने महामंडळाने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. पहिल्या टप्प्यात महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिकांना एनसी एमसी स्मार्ट कार्डचे वाटप करण्यात येत आहे. येत्या १ सप्टेंबरपासून महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिकांसाठी एनसीएमसी स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्यात येणार आहे. त्यामुळे अद्याप नोंदणी न केलेल्या पात्र लाभार्थ्यांनी लवकरात लवकर एनसी एमसी स्मार्ट कार्डसाठी नोंदणी करावी, असे आवाहन एसटी महामंडळाने केले आहे.

मंत्री सरनाईक म्हणाले, एसटी ही केवळ प्रवासाची सेवा नसून महाराष्ट्राच्या जनजीवनाशी जोडलेली लोकवाहिनी आहे. या 'लालपरी'चा प्रवास काळानुरूप अधिक आधुनिक, डिजिटल आणि प्रवाशांसाठी सुलभ करण्याचा आमचा प्रयत्न आहे. NCMC स्मार्ट कार्डला मिळणारा प्रतिसाद हा प्रवाशांचा या डिजिटल परिवर्तनावरील विश्वास दर्शवितो. भविष्यात एसटीच्या सेवांमध्ये तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करून प्रवाशांचा वेळ वाचविणे आणि त्यांचा प्रवास अधिक सोयीस्कर करणे हे आमचे उद्दिष्ट आहे.

१५ ऑगस्टपासून विद्यार्थ्यांना एनसीएम सी कार्डचे वाटप

येत्या १५ ऑगस्टपासून राज्यभरातील सर्व शालेय विद्यार्थ्यांसाठी एनसी एमसी स्मार्ट कार्डच्या नोंदणीची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. प्रत्येक शाळेत जाऊन एसटीचे अधिकृत परवानाधारक प्रतिनिधी ही नोंदणी प्रक्रिया पूर्ण करणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी एनसीएमसी कार्डसाठी इतर कोणत्याही ठिकाणी नोंदणी करू नये, असे आवाहन एसटी महामंडळाने केले आहे.



प्रवाशांना एनसीएमसी स्मार्ट कार्ड अधिकृत एसटी आगार, बसस्थानक तसेच अधिकृत एजंट नेटवर्कच्या माध्यमातून मिळविता येणार असून, त्याच माध्यमातून कार्ड रिचार्जची सुविधाही उपलब्ध आहे.

## वंदे मातरमच्या १५० वर्षपूर्तीनिमित्त पहिल्यांदाच लाल किल्ल्यावरून राष्ट्रगीत गायले जाणार

### जेन–झींचं प्रतिनिधीत्व अधिक पाहायला मिळणार

नवी दिल्ली : सर्व भारतीयांसाठी अभिमानाचा क्षण मानला जाणाऱ्या स्वातंत्र्यदिन सोहळ्यासाठी, पंतप्रधान नरेंद्र मोदी लाल किल्ल्यावर दाखल होतात व तिरंग्याचे ध्वजारोहण करतात. परंतु या वर्षी प्रथमच किल्ल्याच्या तटबंदीवरून राष्ट्रगीत म्हणजेच ' वंदे मातरम' गायले जाणार आहे. तसेच, या सोहळ्यात तरुण विद्यार्थी आणि 'जनरेशन झेड' सदस्यांना अधिक प्रतिनिधित्व मिळेल, ज्यामध्ये गुणवंत विद्यार्थ्यांना तटबंदीवर बसवले जाईल.

संरक्षण सचिव 'राजेश कुमार सिंह' यांनी सोमवारी (१० ऑगस्ट, २०२६) रोजी दिलेल्या माहितीनुसार, त्यांनी घेतलेल्या या राष्ट्रगीत गायनाच्या निर्णयाला विशेष महत्त्व आहे. कारण २०२६ मध्ये राष्ट्रगीताला १५० वर्षे पूर्ण होत आहेत. राष्ट्रगीताने स्वातंत्र्य लढ्यादरम्यान लोकांना संघटित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. राष्ट्रप्रेम व राष्ट्रभक्ती निर्माण केली. त्यामुळे त्याचा सन्मान करणे अनिवार्य आहे. म्हणूनच १५ ऑगस्ट रोजी हे राष्ट्रगीत गायन केले जाईल. पंतप्रधानांच्या आगमनानंतर हे गीत सादर करण्यात येईल व त्यानंतर ते राष्ट्रध्वज फडकवतील आणि देशाला उद्देशून आपले भाषण करतील.

# ठाणे जिल्ह्यात १५ ऑगस्टपासून "Framework for Fertilizer Sale' प्रणाली लागू

## शेतकऱ्यांना मोबाईलवरून खताची उपलब्धता तपासून ऑनलाइन बुकिंगची सुविधा; खत विक्री प्रक्रिया अधिक सुलभ व पारदर्शक होणार

ठाणे (समर्थ गांवकरी)

शेतकऱ्यांना रासायनिक खतांची उपलब्धता सहजपणे तपासता यावी तसेच खत खरेदीसाठी कृषी सेवा केंद्रांवर वारंवार फेऱ्या मारण्याची आवश्यकता भासू नये, यासाठी केंद्र शासनाच्या "Framework for Fertilizer Sale' या उपक्रमांतर्गत ऑनलाइन खत विक्री प्रणाली ठाणे जिल्ह्यात दि. १५ ऑगस्ट २०२६ पासून कार्यान्वित करण्यात येणार आहे. या प्रणालीमुळे शेतकऱ्यांना आपल्या मोबाईलवरून उपलब्ध खतांचा साठा तपासता येणार असून, आवश्यकतेनुसार खतांचे ऑनलाइन बुकिंग करून जवळच्या उपलब्ध विक्रेत्याची निवड करता येणार आहे.

छत्रपती संभाजीनगर व कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये या प्रणालीचा यशस्वी प्रयोग करण्यात आल्यानंतर आता ठाणे, पालघर, नाशिक, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, अहिल्यानगर, लातूर, वाशिम आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये ही सुविधा सुरू करण्यात येत आहे.

ठाणे जिल्ह्यात सुमारे १ लाख ३८ हजार ८६२ शेतकरी असून खरीप हंगामाचे सुमारे ५९ हजार ८३१ हेक्टर क्षेत्र आहे. जिल्ह्यात आतापर्यंत सुमारे ८५ टक्के पेरण्या पूर्ण झाल्या असून, नियोजनबद्ध खतपुरवठ्यामुळे सध्या रासायनिक खतांची टंचाई निर्माण झालेली नाही. जिल्ह्यात सद्यस्थितीत सुमारे १,६११ मेट्रिक टन खतसाठा उपलब्ध आहे. जिल्ह्याला दरवर्षी सुमारे १० ते ११ हजार मेट्रिक टन खताची आवश्यकता भासते. युरिया खताला शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात मागणी असल्याने त्याचा पुरेसा साठा उपलब्ध करून देण्याचे नियोजन कृषी विभागामार्फत करण्यात येते.

**मोबाईलवरून खताची उपलब्धता तपासता येणार**

"Framework for Fertilizer Sale' प्रणालीमुळे शेतकऱ्यांना घरबसल्या मोबाईलद्वारे आपल्या आवश्यकतेनुसार युरिया, डीएपी यांसारख्या अनुदानित खतांची खरेदी करण्यासाठी ऑनलाइन प्रक्रिया करता येणार आहे. शेतकऱ्यांना उपलब्ध खतसाठा, विक्रेत्याचे ठिकाण तसेच उपलब्धतेनुसार योग्य विक्रेता निवडण्याची सुविधा या प्रणालीमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या प्रणालीवर शेतकऱ्यांना आधार क्रमांक किंवा Farmer ID च्या माध्यमातून नोंदणी करता येणार आहे. ऑनलाइन बुकिंग केल्यानंतर संबंधित शेतकऱ्याला QR Code आणि ढ्ढशप छीलशी प्राप्त होईल. हा QR Code संबंधित खत विक्रेत्याकडे दाखवल्यानंतर विक्रेत्यामार्फत त्याचे स्कॅनिंग करून निर्धारित प्रमाणानुसार खताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल.

या ऑनलाइन प्रणालीमुळे खताची उपलब्धता, बुकिंग आणि वितरण प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक, नियोजनबद्ध आणि शेतकरीहिताची होण्यास मदत होणार आहे. तसेच खत उपलब्ध आहे की नाही, हे जाणून घेण्यासाठी शेतकऱ्यांना कृषी सेवा केंद्रावर वारंवार जाण्याची आवश्यकता कमी होणार असून, त्यांचा वेळ व प्रवासाचा खर्च वाचणार आहे.

"Framework for Fertilizer Sale' ॲपची कार्यपद्धती

**१. लॉगिन व पडताळणी :**

मोबाईलमध्ये "Framework for Fertilizer Sale' ॲप उघडून राज्याची निवड करावी. त्यानंतर आधार क्रमांक प्रविष्ट करून प्राप्त OTP द्वारे पडताळणी पूर्ण करावी.

**२. जमिनीची नोंदणी :**

जमीन स्वतःच्या मालकीची, भाडेकरू अथवा संयुक्त मालकीची असल्यास संबंधित पर्याय निवडावा. त्यानंतर जिल्हा, तालुका, गाव आणि सर्व्हे/गट क्रमांकाची माहिती भरून "Fetch Land' पर्यायाद्वारे जमिनीची माहिती प्राप्त करावी.

**३. पीक निवड :**

संबंधित हंगामाची निवड करून लागवड केलेले पीक निवडावे. निवडलेल्या पिकानुसार खताची शिफारस उपलब्ध होईल.

**४. खतासाठी अर्ज :**

शासनाच्या GFR (General Fertilizer Recommendation) नुसार शिफारस करण्यात आलेल्या खतांची यादी व प्रमाण ॲपवर दिसेल. त्यानुसार आवश्यक खताची निवड करावी.

**५. खताचे प्रमाण निश्चित करणे :**

आवश्यक खताच्या बॅगांची संख्या निवडावी. एका अर्जामध्ये एकापेक्षा अधिक प्रकारची खते निवडण्याची सुविधा उपलब्ध आहे.

**६. खत विक्रेता निवडणे :**

जवळील उपलब्ध खत विक्रेत्यांची यादी ॲपवर उपलब्ध होईल. उपलब्ध साठा आणि अंतर यांचा विचार करून योग्य विक्रेत्याची निवड करावी.

**७. खत घेणारी व्यक्ती निवडणे :**

खत स्वतः घेणार असल्यास 'स्वतः' हा पर्याय निवडावा. प्रतिनिधीमार्फत खत घेणार असल्यास संबंधित प्रतिनिधीची माहिती भरावी. आधार क्रमांक व मोबाईल क्रमांकाची पडताळणी आवश्यक राहील.

**८. QR Code व Token Number प्राप्त करणे :**

अर्ज यशस्वीरीत्या सादर झाल्यानंतर QR Code आणि Token Number तयार होईल. हा QR Code सुरक्षितपणे जतन करून ठेवावा.

**९. खत प्राप्त करणे :**

निवडलेल्या विक्रेत्याकडे जाऊन QR Code दाखवावा. विक्रेत्यामार्फत QR Code स्कॅन करून अर्जातील माहिती व खताचे प्रमाण तपासले जाईल. व्यवहार पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्याला खत उपलब्ध करून देण्यात येईल व त्याची पावती घ्यावी.

**प्रणालीच्या अंमलबजावणीसाठी कृषी विभाग सज्ज**

ठाणे जिल्ह्यात "Framework for Fertilizer Sale' प्रणाली प्रभावीपणे कार्यान्वित करण्यासाठी कृषी विभागामार्फत आवश्यक पूर्वतयारी करण्यात येत आहे. जिल्हास्तरीय मास्टर ट्रेनरच्या माध्यमातून क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी, कर्मचारी तसेच कृषी निविष्ठा विक्रेत्यांचे प्रशिक्षण घेण्यात येत आहे. तसेच QR Code च्या माध्यमातून खत विक्रीसाठी विकसित करण्यात आलेल्या नवीन प्रणालीची कार्यपद्धती संबंधितांना समजावून सांगण्यात येत आहे.

शेतकऱ्यांना या प्रणालीचा सहज वापर करता यावा, यासाठी प्रणालीबाबत आवश्यक जनजागृती व प्रचार–प्रसिद्धीही कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी नवीन प्रणालीचा वापर करून खत खरेदी प्रक्रिया अधिक सुलभ करून घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. ठाणे जिल्ह्यात दि. १५ ऑगस्ट ते २० ऑगस्ट दरम्यान "Framework for Fertilizer Sale' ही ऑनलाइन खत विक्री प्रणाली सुरू होत आहे. या प्रणालीमुळे शेतकऱ्यांना घरबसल्या मोबाईलवरून खताची उपलब्धता तपासता येईल आणि आपल्या गरजेनुसार उपलब्ध विक्रेत्याची निवड करून खताचे ऑनलाइन बुकिंग करता येणार आहे. आधार किंवा Farmer ID च्या माध्यमातून नोंदणी करून QR Code द्वारे खत प्राप्त करता येणार असल्याने खत खरेदी व वितरण प्रक्रिया अधिक सुलभ आणि पारदर्शक होण्यास मदत होईल. शेतकऱ्यांचा वेळ व खर्च वाचविण्यासोबतच खत वितरणाचे अधिक प्रभावी नियोजन करण्यासाठी ही प्रणाली उपयुक्त ठरणार आहे. ठाणे जिल्ह्यातील अधिकाधिक शेतकऱ्यांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, अशी माहिती कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे मुनिर बाचोटीकर यांनी दिली.

**महत्त्वाच्या सूचना**

खत खरेदीसाठी आधार प्रमाणीकरण आवश्यक राहील.

शेतकऱ्यांची जमिनीची माहिती अद्ययावत असणे आवश्यक आहे.

GFR नुसार शिफारस करण्यात आलेल्या खताची माहिती तपासूनच खताची निवड करावी.

ऑनलाइन बुकिंगनंतर प्राप्त झालेला QR Code सुरक्षित ठेवावा.

चुकीची किंवा अपूर्ण माहिती भरल्यास अर्जाच्या प्रक्रियेत विलंब होऊ शकतो.

खताची खरेदी केवळ नोंदणीकृत खत विक्रेत्याकडूनच करावी.

खत विक्री व वितरणासंदर्भातील अधिकृत माहिती कृषी विभागाकडूनच घ्यावी.

तक्रार निवारण सुविधा

ऑनलाइन अर्ज, खताची उपलब्धता, बुकिंग अथवा खत वितरणासंदर्भात कोणतीही अडचण आल्यास संबंधित तालुका कृषी अधिकारी, गुणनियंत्रण निरीक्षक, तालुका कृषी अधिकारी कार्यालय किंवा पंचायत समितीतील कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधता येईल. प्राप्त तक्रारीची पडताळणी करून पात्र प्रकरणांमध्ये नियमानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

ठाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी १५ ऑगस्टपासून कार्यान्वित होणाऱ्या "Framework for Fertilizer Sale' या नवीन ऑनलाइन प्रणालीचा वापर करून खताची उपलब्धता, बुकिंग आणि खरेदी प्रक्रिया अधिक सुलभ करून घ्यावी आणि या डिजिटल सुविधेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषद, ठाणेच्या कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

# कर्जत-जामखेड मतदारसंघातील प्रलंबित विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा

## आमदार रोहित पवार यांची जिल्हाधिकाऱ्यांसोबत मॅरेथॉन बैठक संपन्न

जामखेड (समर्थ गांवकरी)

कर्जत-जामखेड मतदारसंघातील प्रलंबित असलेल्या विविध प्रश्नांसंदर्भात आमदार रोहित पवार यांनी अहिल्यानगरमध्ये जिल्हाधिकारी पंकज आशिया यांच्यासह सर्व विभागांच्या प्रमुख अधिकाऱ्यांसोबत चार तास प्रदीर्घ बैठक घेतली. यावेळी रस्त्यांची संथगतीने सुरु असलेली कामे, निकृष्ट कामांची चौकशी, वीजपुरवठ्याबाबतच्या तक्रारी, शासकीय इमारतींची रद्द झालेली कामे, कर्जत-जामखेड शहरातील अस्वच्छता, पाणीपुरवठ्याच्या कामाच्या तक्रारी, वाढती गुन्हेगारी आदी विषयांवर सविस्तर चर्चा झाली. तसेच प्रलंबित विषय तातडीने मार्गी लावण्याच्या आणि तक्रार असलेल्या कामांबाबत चौकशी करुन कारवाई करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

यावेळी जिल्हाधिकारी पंकज आशिया यांच्यासह इतर सर्व विभागांचे प्रमुख अधिकारी या बैठकीला उपस्थित होते. तालुका स्तरावर सातत्याने प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबत बैठका घेऊन जनहिताचे प्रश्न मार्गी लावण्याचा आमदार रोहित पार यांचा सातत्याने प्रयत्न असतो. परंतु काही विषय हे जिल्हा पातळीवरील असल्याने या प्रश्नांसंदर्भात त्यांनी बुधवारी अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मॅरेथॉन बैठक घेतली. तब्बल ४ तास चाललेल्या या बैठकीची जोरदार चर्चा आहे.

कोणतेही कारण न देता मतदारसंघातील २३९ पाणंद रस्ते रद्द करण्यात आले आहेत तर रोजगार हमी योजनेतून कर्जत तालुक्यात १५२० आणि जामखेड तालुक्यात ९३० विहिरी मंजूर झाल्या असतानाही केवळ कामे सुरु न केल्याने त्या रद्द करण्यात आल्या. यावर आमदार रोहित पवार यांनी बैठकीत अधिकाऱ्यांना धारेवर धरले. बळीराजा शेतपाणंद रस्ते योजनेअंतर्गत मतदारसंघातील ११६८ रस्त्यांचा प्रस्ताव पाठवला मात्र केवळ ३५ कि. मी. अंतरावरील रस्त्यांनाच मंजुरी देण्यात आली असून उर्वरित ११३३ रस्त्यांनाही निधी मंजूर करून देण्याची मागणी यावेळी करण्यात आली. शेतकऱ्यांना जमिन मोजणीच्या कामांना विलंब होत असल्याने ती तातडीने करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. सिद्धटेक येथील सभामंडपाच्या कामकाजात येणारे अतिक्रमण हटवणे, पोटखराबा जमीन लागवडीयोग्य नोंदणी करण्यास ३-३ वर्षे होणारा विलंब, पिक विमा योजनेतील शेतकऱ्यांच्या तक्रारी, रेशनकार्ड धारकांचे प्रश्न आणि इष्टांक वाढवून मिळणे, निमगाव गांगर्डा, पाटेगाव, चापडगाव, आंबी जळगाव आणि कुळधरण येथील तलाठी कार्यालयांना जागा उपलब्ध न झाल्याने ही कामे रद्द झाली, या विषयांवर सविस्तर चर्चा झाली. औटेवाडी येथील ग्रामस्थांना शिल्लक प्लॉट उपलब्ध करून देण्याचा विषय, कुकडी डावा कालवा प्रकल्पासाठीच्या भूसंपादनाचे प्रलंबित ४७ प्रस्ताव, खैरी प्रकल्पाच्या कालवाग्रस्त शेतकऱ्यांचा प्रलंबित मोबदला तातडीने देणे, कर्जत शहरातील अस्वच्छता, रमाई आवास योजनेतील घरकुलांचा प्रश्न, व्यापार संकुलातील गाळ्यांची सुरक्षा, भटके कुत्रे व मोकाट जनावरांचा होणारा त्रास, कर्जत शहरातील सीसीटीव्ही यंत्रणेचा विस्तार, कर्जत शहराचा पाणीपुरवठा, जामखेडमधील मलनिःस्सारण प्रकल्पाचे निकृष्ट बांधकाम आणि कामे न करता काढलेली बोगस बिले, कचरा डेपोमुळे जामखेडमधील आयटीआय मधील विद्यार्थ्यांना होणारा त्रास, शहरातील अस्वच्छता, जामखेड शहरातील व्यापारी संकुलासाठीचा वीजपुरवठा, लोकांना जन्म दाखल्यांसाठी ३-४ महिने करावी लागणारी प्रतीक्षा, मागील वर्षी अतिवृष्टीमुळे वाहून गेलेला खेड-शिंपोरा रस्त्यावरील नांदणी नदीवर नव्याने पुल उभारणे आणि तूर्तास आर्मी बेली ब्रीजची उभारणी या प्रत्येक विषयावर या बैठकीत सविस्तर चर्चा झाली आणि कोणतेही कारण न देता हे विषय मार्गी लावण्याचा आग्रह यावेळी आमदार रोहित पवार यांनी धरला आणि तशा स्पष्ट सूचनाही अधिकाऱ्यांना दिल्या.

जामखेड शहरातील महामार्गाचे काम अतिशत संथ गतीने सुरु आहे. श्रीगोंदा-जामखेड रस्त्याला मोठ्या प्रमाणात भेगा पडल्या आहेत. जलजीवन मिशन योजनेतील काही गावांमधील कामे ही निकृष्ट दर्जाची झाली आहेत. त्यामुळे कर्जत आणि जामखेड या दोन्ही तालुक्यातील संथ गतीने सुरु असलेली रस्त्यांची सर्वच कामे वेगाने आणि दर्जेदार करण्याच्या आणि निकृष्ट दर्जाच्या कामांची चौकशी करुन कारवाई करण्याचा सूचना या बैठकीत अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. तसेच कर्जत तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये कमी असलेल्या ७४ शिक्षकांची तातडीने नेमणूक करण्याची मागणीही आमदार रोहित पवार यांनी यावेळी केली.

यंदा पावसाला आधीच उशीर झाला असताना खते आणि बियाण्यांची साठेबाजी होऊन त्यांची चढ्या भावाने विक्री केली जाते. यामुळे आधीच अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना आणखी अडचणींचा सामना करावा लागतो. या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देऊन साठेबाजी आणि चढ्या भावाने खते आणि बियाण्यांची विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. जामखेड तालुक्यातील काही तलाठी कार्यालयांची कामे निकृष्ट झाली असून १४ तलाठी कार्यालये सुरु होऊन बंद झाले तर ९ तलाठी कार्यालये अद्याप सुरुही झालेले नाहीत. कृषीच्या फिडरवर असलेल्या काही वाड्या वस्त्यांना सायंकाळी ६ ते १० या वेळेत अजूनही वीज मिळत नाही. सिंगल फेज वीज पुरवठ्यासंदर्भातील अनेक कामे प्रलंबित असून ते तातडीने पूर्ण करण्याच्या सुचना यावेळी देण्यात आल्या. जळालेली रोहित्रे तातडीने बदलून मिळत नाहीत आणि सोलार योजनेतही अनेक अडचणी आहेत. त्या सोडवण्याबाबतही या बैठकीत सविस्तर चर्चा झाली.

या बैठकीत कायदा व सुव्यवस्थेबाबतही सविस्तर चर्चा झाली. कर्जत-जामखेड मतदारसंघात अनेक अवैध धंदे सुरु असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत आहेत. तसेच खोटे गुन्हे दाखल करण्याचे प्रमाणही वाढत असल्याने निरपराध नागरिकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागते, अशी चुकीची कामे पूर्णपणे बंद करण्याच्या सूचना त्यांना पोलिस विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिल्या. भरोसा सेलच्या माध्यमातून प्रभावी काम करता येते हे मागील काही काळात दिसून आले आहे. त्याअनुषंगाने हे काम अधिक चांगल्या प्रकारे करण्याच्या सूचनाही या बैठकीत देण्यात आल्या. कर्जत आणि जामखेड या दोन्ही शहरात विद्यार्थी-विद्यार्थीनींना कोणताही त्रास होऊ नये याची काळजी घेण्याच्यादृष्टीने पोलिसांची गस्त वाढवण्याच्या आणि बस स्थानकावर सीसीटीव्ही लावण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या. शिवाय पोलिस विभागासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याची मागणीही यावेळी पोलिस अधीक्षकांकडे करण्यात आली.

> ''माझ्या कर्जत-जामखेड मतदारसंघात तालुका पातळीवर सातत्याने अधिकाऱ्यांसोबत बैठका घेऊन जनहिताचे निर्णय मार्गी लावण्याचा माझा सातत्याने प्रयत्न असतो, पण जे प्रश्न वरिष्ठ पातळीवर सोडवायचे असतात त्या विषयांसाठी जिल्हाधिकारी पंकज आशिया साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत अहिल्यानगर इथं बैठक झाली. या बैठकीला इतर सर्व विभागांचे प्रमुख अधिकारीही उपस्थित होते. या बैठकीत रस्ते, पाणीपुरवठा, पीक विमा, सार्वजनिक विकास कामे व वैयक्तिक लाभार्थ्यांचे विषय, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न, वीज पुरवठ्याबाबची अडचण, खते आणि बियाण्यांचा काळाबाजार, सार्वजनिक हिताच्या कामांमध्ये न पाळली जाणारी गुणवत्ता आदी प्रत्येक विषयावर सविस्तर चर्चा झाली आणि हे प्रश्न तातडीने मार्गी लावण्याबाबत सूचना अधिकाऱ्यांना दिल्या. सर्वच अधिकारी हे चांगलं काम करण्याचा प्रयत्न करत असून काम करताना त्यांना येणाऱ्या अडचणींवरही यावेळी चर्चा झाली. अपेक्षा आहे की, पुढील काही दिवसांत हे सर्व प्रश्न वेगाने मार्गी लागतील''
>
> - रोहित पवार (आमदार, कर्जत-जामखेड)

# सातवी शिष्यवृत्ती परीक्षेत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयाची दमदार कामगिरी

## १७ विद्यार्थीनी शिष्यवृत्तीधारक; स्वरा शेळके राज्यात १४ वी

श्रीगोंदा : रयत शिक्षण संस्थेच्या श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालय, श्रीगोंदा या विद्यालयाने सातवी शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन करून शैक्षणिक गुणवत्तेची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे.

विद्यालयातील एकूण ७५ विद्यार्थीनी परीक्षेस प्रविष्ट झाल्या होत्या. त्यापैकी ५६ विद्यार्थीनी पात्र ठरल्या असून १७ विद्यार्थीनींनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवत शिष्यवृत्तीधारक होण्याचा मान पटकावला आहे. विद्यालयाचा निकाल ७५.६८ टक्के लागला आहे.




या यशात विद्यालयातील गुणवंत विद्यार्थीनी शेळके स्वरा विलास हिने २७६ गुण मिळवत राज्यात १४ वा क्रमांक पटकावला. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

गुणवंत विद्यार्थीनींची यादी

शिष्यवृत्तीधारक विद्यार्थीनी पुढीलप्रमाणे : शेळके स्वरा विलास (२७६), खामकर समर्था सुनील (२५६), भुजबळ भूमी दिनकर (२५४), म्हस्के स्वराली हंबीर (२५२), शिंदे अंशुला नितीन (२५२), वाळूंज ईश्वरी किशोरचंद्र (२५०), फडताळे स्वराली गणेश (२४८), बोनगे स्नेहा शंकर (२४०), सुद्रिक सिद्धी मच्छिंद्र (२३०), सुद्रिक वेदिका पांडुरंग (२२८), मचे श्रवंती तुषार (२२४), मोटे अमृता सुहास (२२२), शेंडगे श्रावणी सुधीर (२२२), कुताळ सई अरुण (२१८), बांदल सायली शिवाजी (२१६), तळेकर सई महादेव (२१६) आणि हिंगणे वैष्णवी सचिन (२१४).

शिक्षकांचे मार्गदर्शन लाभदायी

विद्यार्थिनींच्या या यशामागे विभागप्रमुख व वर्गशिक्षक सचिन गारुडकर (बुद्धिमत्ता), कुंदन खामकर (गणित), जयश्री कुदांडे (मराठी) आणि विठ्ठल होले (इंग्रजी) यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल मुख्याध्यापिका वर्षा भोईटे, पर्यवेक्षक बाळासाहेब शिंदे तसेच गुरुकुलप्रमुख किरण शिंदे यांनी सर्व यशस्वी व गुणवंत विद्यार्थीनी, मार्गदर्शक शिक्षक आणि पालकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

विद्यालयाच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन, व्हा. चेअरमन, विभागीय अधिकारी, सहा. विभागीय अधिकारी, स्थानिक स्कूल कमिटी, शाळा व्यवस्थापन समिती, माता-पालक व शिक्षक-पालक संघ तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी यशस्वी विद्यार्थीनींचे अभिनंदन केले आहे.

विद्यार्थिनींची मेहनत, शिक्षकांचे प्रभावी मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यांच्या त्रिवेणी संगमातून विद्यालयाने हे घवघवीत यश संपादन केले असून विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी एक मानाचा अध्याय जोडला गेला आहे.

# मेंढपाळ -पशुपालकांवरील कारवाई थांबवा

## प्रत्येक जिल्ह्यात चराई क्षेत्र निश्चित करा<br>खासदार नीलेश लंके मंत्री भूपेंद्र यादव यांच्याकडे मागणी

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्रातील मेंढपाळ, धनगर समाज आणि पारंपरिक पशुपालकांच्या उपजीविकेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, पशुधन चारण्यासाठी जाणाऱ्या गुराख्यांवर वन विभागाकडून करण्यात येणारी दंडात्मक कारवाई तातडीने थांबवावी, अशी मागणी खासदार नीलेश लंके यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले आहे.

महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्थेत पशुपालनाला महत्त्वाचे स्थान असून, लाखो कुटुंबांचा उदरनिर्वाह मेंढ्या, शेळ्या व इतर पशुधनावर अवलंबून आहे. धनगर व पारंपरिक पशुपालक समाजातील कुटुंबे पिढ्यान्पिढ्या वनक्षेत्रालगतच्या सरकारी पडीक व गायरान जमिनीवर पशुधन चारून उपजीविका करीत आहेत. मात्र, अलीकडील काळात राज्यातील विविध भागांत वन विभागाच्या स्थानिक अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून पारंपरिक गुराख्यांवर अन्यायकारक कारवाई होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याचे लंके यांनी पत्रात नमूद केले आहे.

पशु चराईच्या कारणावरून गुराख्यांना अडविणे, त्यांच्याशी गैरवर्तन करणे, महिलांशी अभद्र वर्तन करणे, पशुधन जबरदस्तीने ताब्यात घेणे, मोठा दंड आकारणे तसेच कथित खोटे किंवा किरकोळ गुन्हे दाखल करणे, अशा तक्रारी पशुपालकांच्या प्रतिनिधींनी आपल्याकडे मांडल्या आहेत. एकीकडे चारा टंचाई, दुष्काळी परिस्थिती आणि पशुपालनाचा वाढता खर्च यामुळे हा समाज आर्थिक संकटात आहे. त्यातच अशा कारवाईमुळे हजारो कुटुंबांच्या उपजीविकेवर परिणाम होत असल्याचे लंके यांनी म्हटले आहे.



वन, पर्यावरण आणि वन्यजीव संरक्षणाला आपला पूर्ण पाठिंबा असल्याचे स्पष्ट करताना, वनसंवर्धनाच्या नावाखाली गरीब पशुपालकांच्या पारंपरिक उपजीविकेवर गदा येणे योग्य नाही, अशी भूमिका लंके यांनी मांडली. गुराखी हा गुन्हेगार नसून प्रतिकूल परिस्थितीत पशुधन सांभाळून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारा मेहनतकरी नागरिक आहे,असे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

सरकारी पडीक व गायरान जमिनीवर पशुधन चारणाऱ्या गरीब गुराख्यांविरुद्ध करण्यात येणारी कठोर कारवाई तातडीने थांबवावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. पशु चराईच्या कारणावरून दाखल झालेल्या किरकोळ अथवा कथित खोट्या प्रकरणांची निष्पक्षपणे फेरतपासणी करून योग्य ती प्रकरणे मागे घ्यावीत.

# अहिल्यानगर जिल्हा बँकेवर राष्ट्रवादीचा दावा; अध्यक्षपदासाठी हालचालींना वेग

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. बुधवारी मुंबईत पक्षाच्या अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत जिल्हा बँक पुन्हा पक्षाच्या ताब्यात आणण्यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देश जिल्ह्यातील पक्षाच्या नेत्यांना सुनेत्रा पवार यांनी दिले आहेत. यापूर्वी नगरची जिल्हा बँक राष्ट्रवादीचे ताब्यात होती. यापुढे देखील ती राष्ट्रवादी अजित दादा गटाच्या ताब्यात राहावी, यासाठी नेत्यांनी कामाला लागावे असे आदेश उपमुख्यमंत्री पवार यांनी यावेळी दिले.




जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष चंद्रशेखर घुले यांच्या नेतृत्वाखाली मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे उपमुख्यमंत्री पवार यांच्या उपस्थितीत बुधवारी प्राथमिक बैठक झाली.

या बैठकीला सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आमदार आशुतोष काळे, आमदार काशीनाथ दाते, बँकेचे माजी संचालक सीताराम गायकर, राहुल जगताप, राजेंद्र नागवडे, प्रशांत गायकवाड, अरूण तनपुरे, पक्षाचे दक्षिण जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, उत्तर जिल्हाध्यक्ष कपिल पवार आदी उपस्थित होते.

यावेळी घुले यांनी सद्यस्थितीची माहिती सुनेत्रा पवार यांना दिली. तालुकानिहाय पक्षाची ताकद, झालेले ठराव याबाबत घुले यांनी माहिती दिली. गेल्या पंचवार्षिक निवडणुकीत तत्कालीन राष्ट्रवादी एकत्रित असतांना १० जागा मिळाल्या होत्या. तेव्हा राष्ट्रवादीचा पहिला अध्यक्ष झाला होता. त्यानंतर दीड वर्षांनी बँकेत सत्तांतर झाले होते. तेव्हा भाजपचे स्व. आमदार शिवाजी कर्डिले हे अध्यक्ष झाले. मात्र स्व. कर्डिले यांच्या निधनानंतर पुन्हा राष्ट्रवादीकडे बँकेची सत्ता आली. चंद्रशेखर घुले हे बँकेचे अध्यक्ष झाले होते. त्यांनी चार महिने बँकेचा कारभार पाहिल्यानंतर संचालकांची मुदत संपल्याने बँकेवर प्रशासक नियुक्त करण्यात आले आहे. बँकेवर राष्ट्रवादीचे वर्चस्व राहिले असल्याने पुन्हा बँकेत पक्षाची सत्ता आणण्याचे निर्देश यावेळी सुनेत्रा पवार यांनी दिले. बँकेचा निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्यापूर्वीच राष्ट्रवादी काँग्रेसने निवडणुकीची तयारी सुरू करण्यात आघाडी घेतली आहे.

जिल्हा बँकेच्या आगामी निवडणुकीत नगर जिल्ह्यात राष्ट्रवादी अजित दादा पवार गटाने कोणावरही अवलंबून न राहता स्वबळावर निवडणूक लढवण्याची तयारी ठेवावी अशी सूचना उपमुख्यमंत्री पवार यांनी यावेळी दिली. जिल्ह्यात सध्या सत्ताधारी भाजपमधील सभापती राम शिंदे आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भूमिका वेगवेगळी दिसत असल्याने त्याचा फायदा राष्ट्रवादीला कसा होईल या दृष्टीने नियोजन करण्याचे यावेळी सांगण्यात आले.

# राज्यातील शेतकर्याच्या संरक्षणासाठी जलसंपदा विभागाचे काम : ना.विखे पाटील

## पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे मूल्य जपण्याचे प्राधिकारणाच्या कार्यशाळेत आवाहन

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

राज्यातील जलसंपदा विभाग अधिक सक्षम, आधुनिक, लोककेंद्री करण्यासाठी २०२९ पर्यंत जलसंपदा विभागाच्या महामंडळांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. जलसंपदाचा केंद्रबिंदू शेतकरी आणि नागरिक असून, शेतीचे संरक्षण करतानाच शहरांची व उद्योगांची पाण्याची गरज भागविण्यासाठी शाश्वत जलनियोजन करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या २१व्या वर्धापन दिनानिमित्त मुंबईतील वरळी डोम येथील 'द पॅलेस हॉल'मध्ये आयोजित परिसंवाद व कार्यशाळेच्या समारोप सत्रात ते बोलत होते. यावेळी जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या अध्यक्षा श्वेताली ठाकरे, प्राधिकरणाचे आजी-माजी सदस्य, जलसंपदा विभागातील वरिष्ठ अधिकारी तसेच राज्यातील विविध जलविकास संस्थांचे अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जलसंपदा विभागासमोर ठेवलेल्या विकासाच्या रोडमॅप नुसार विभागाने काम करणे आवश्यक आहे. 'विकसित महाराष्ट्र २०४७'चे उद्दिष्ट साध्य करताना शेती व्यवसायाला बाधा न आणता त्याचे संरक्षण करूनच शहर व उद्योगांसाठी पाण्याचे नियोजन करावे लागेल, असे मंत्री विखे पाटील यांनी स्पष्ट केले. सिंचनाच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करणे, शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणे आणि उपलब्ध जलसंपत्तीचा शाश्वत वापर करणे ही जलसंपदा विभागाची प्रमुख जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

जलसंपदा विभागाने अनेक वर्षे मोठ्या प्रमाणावर काम केले असले, तरी या कामातून अपेक्षित सामाजिक परिणाम साध्य झाला का, याचेही मूल्यमापन आवश्यक आहे. सिंचन सुविधा निर्माण झाल्यानंतरही ग्रामीण भागातून होणारे स्थलांतर कमी झाले का, शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञान व नव्या पिकपद्धतींचा स्वीकार कितपत झाला, याचा विचार करण्याची गरज आहे. यासाठी जलसंपदा आणि कृषी विभागामध्ये अधिक प्रभावी समन्वय आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

महामंडळांच्या आर्थिक स्वयंपूर्णतेवर भर

जलसंपदा महामंडळांना दीर्घकाळ शासनाच्या निधीवर अवलंबून न ठेवता स्वतःचे आर्थिक स्रोत निर्माण करण्याची गरज आहे. गेल्या वर्षभरात धरणांच्या परिसरातील अतिक्रमणे हटवून सुमारे ५६ हजार एकर जमीन महामंडळांच्या नावावर करण्यात आली आहे. ही जमीन महामंडळांची महत्त्वाची आर्थिक मालमत्ता असून, तिचा सुयोग्य वापर करून प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आर्थिक बळकटी निर्माण करता येईल, असे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

महामंडळांनी महसुलाचे विविध स्रोत निर्माण करावेत. पाणीपट्टीची वेळेत वसुली, पाणीगळती रोखणे आणि पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे मूल्य व उत्तरदायित्व निश्चित करणे आवश्यक आहे. जलवापरातून मिळणारा महसूल वाढल्यास नवीन सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करणे अधिक सुलभ होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. नद्या व कालव्यांचे प्रदूषण रोखण्याची जबाबदारी केवळ प्रदूषण नियंत्रण मंडळाची नसून जलसंपदा विभागाचीही आहे. वाढत्या नागरीकरणाच्या पार्श्वभूमीवर महानगरांमध्ये वापरलेल्या पाण्यापैकी किमान ८० टक्के पाण्याचा पुनर्वापर करण्याच्या दिशेने ठोस प्रयत्न आवश्यक आहेत. अनेक पाणीपुरवठा योजना नदीच्या पाण्यावर अवलंबून असताना जलप्रदूषण वाढणे ही गंभीर बाब आहे, असेही मंत्री विखे पाटील यांनी नमूद केले.




धरणांमध्ये उपलब्ध पाण्याचे प्रमाण लक्षात घेऊन त्यानुसार पीक पद्धती व लागवडीचे नियोजन करण्यासाठी कृषी आणि जलसंपदा विभागाने एकत्रितपणे काम करावे. उपलब्ध पाण्याच्या क्षमतेनुसार पिकांची निवड केल्यास शेती अधिक बागायती, उत्पादनक्षम आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर होण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय<br>ता. अकोले, जि. अहिल्यानगर**

क्र.कावि/फौजदारी / वारस नोंद/१७/२०२६ अकोले दि. १३/०८/२०२६

श्री. योगेश संजय बारे, रा. राजुर, ता.अकोले, जि.अहिल्यानगर यांची आई कै. मीना संजय बारे उर्फ (माहेरकडील नाव मीना काळू देशमुख) हे दि. १५/०४/२०२६ रोजी सह्याद्री सुपर स्पेसिलीटी हॉस्पिटल नाशिक येथे मयत झाले. सदर मयत व्यक्ती हे आरोग्य केंद्र खिरविरे येथे आरोग्य सहाय्यक महिला या पदावर कार्यरत होते. मयत व्यक्तीच्या वारसांना शासनाकडून देय रक्कमा मिळणेसाठी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज सादर केला असुन त्यात खालीलप्रमाणे वारस असल्याचे दर्शविले आहे.

| अक्र. | वारसाचे नाव | वय वर्ष | नाते |
|---|---|---|---|
| १ | योगेश संजय बारे | २८ | मुलगा |
| २ | वर्षा योगेश शिंदे | २७ | मुलगी |

या जाहिर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, वरील वारस प्रमाणपत्र बाबतचे कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रासह लेखी स्वरुपात या जाहीर प्रकटनाच्या तारखेपासून ७ दिवसाचे आत या कार्यालयास सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधितांस वारस प्रमाणपत्र निर्गमीत करण्यात येईल.

**तहसिलदार तथा<br>कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

## थोडक्यात पण महत्वाचे

### शिस्त, व्यायाम आणि ध्येयधोरणातून युवकांनी राष्ट्रनिर्मितीत योगदान द्यावे



**नेवासा** (समर्थ गांवकरी) : मेजर नवनाथ खामकर यांचे प्रतिपादन; महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त व्याख्यान

श्रीगोंदा, दि. १३ ऑगस्ट : युवाशक्ती ही राष्ट्रनिर्माणाची खरी शक्ती आहे. युवकांनी महाविद्यालयीन जीवनात शिस्तीचे पालन केले, नियमित व्यायाम व योगासने केली आणि अभ्यासाची सवय लावली, तर त्यांचे भविष्य निश्चितच उज्ज्वल होईल, असे प्रतिपादन मेजर नवनाथ खामकर यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, श्रीगोंदा येथे राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त 'युवाशक्ती राष्ट्रनिर्माणाची शक्ती' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मेजर खामकर बोलत होते.

मेजर खामकर म्हणाले, भारतीय सैन्यात शिस्तीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. सैन्यातील कठोर शिस्त सैनिकांच्या जीवनात आत्मअनुशासन रुजवते. मात्र शिस्त ही केवळ सैन्यापुरती मर्यादित नसून ती प्रत्येकाच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. जीवनातील कोणतेही कार्य शिस्तबद्ध पद्धतीने केले, तर ध्येय साध्य करणे निश्चितच शक्य होते.

### उमेद अभियानांतर्गत ढवळगावात 'नवी दिशा' महिला ग्रामसंघाची स्थापना



**श्रीगोंदा** (गांवकरी) : उमेद अभियान, पंचायत समिती श्रीगोंदा अंतर्गत ढवळगाव येथे 'नवी दिशा' महिला ग्रामसंघाची स्थापना करण्यात आली. गावातील महिला बचत गटांना संघटित करून त्यांच्या आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणाला चालना देण्याच्या उद्देशाने हा ग्रामसंघ स्थापन करण्यात आला.

ग्रामसंघ स्थापनेचे फायदे, ग्रामसंघाची रचना व कार्यपद्धती, विविध समित्यांची स्थापना तसेच ग्रामसंघांना उपलब्ध होणाऱ्या विविध प्रकारच्या निधीबाबत तालुका व्यवस्थापक राहुल साळवे आणि प्रभाग समन्वयक दत्तात्रय राखुंडे यांनी उपस्थित महिलांना सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी ढवळगावातील एकूण २० महिला बचत गटांच्या अध्यक्ष, सचिव व सदस्यांसह गावच्या माजी सरपंच अनिता वाळुंज तसेच माजी उपसरपंच मनिषा बोरगे उपस्थित होत्या. कार्यक्रमादरम्यान ग्रामसंघाच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.

गावातील महिलांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे ग्रामसंघ स्थापनेचा कार्यक्रम उत्साहात व यशस्वीपणे पार पडला. बचत गटांच्या माध्यमातून महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून गावात मोठी आर्थिक क्रांती घडविण्याचा विश्वास उपस्थित महिलांनी व्यक्त केला.

### महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय युवा दिन उत्साहात साजरा




**श्रीगोंदा** (गांवकरी) : महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) सिनिअर विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय युवा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. युवकांमध्ये सामाजिक जाणीव, राष्ट्रीय भावना आणि जबाबदार नागरिकत्वाची भावना रुजविण्याच्या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे होते. यावेळी त्यांनी युवा शक्तीचे महत्त्व अधोरेखित करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. डॉ. राजेंद्र ठाकरे व डॉ. राजाराम कानडे यांनी युवकांची सामाजिक जबाबदारी, राष्ट्रनिर्मितीतील युवकांची भूमिका तसेच बदलत्या परिस्थितीत युवकांसमोरील संधी व आव्हाने याबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. देवेंद्र बहिरम यांनी केले. युवकांनी राष्ट्रीय सण व उत्सवांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन देशभक्तीची भावना जोपासावी, असे आवाहन त्यांनी केले.

# धरण क्षेत्रात मत्स्य व्यवसाय विकासासाठी संयुक्त सर्वेक्षण करणार : ना. विखे पाटील

## मत्स्य व्यवसाय विकास मंत्री नितेश राणे यांच्यासह संयुक्त बैठकीत प्रतिपादन

अहील्यानगर दि. प्रतिनिधी

जलसंपदा विभागाच्या धरणांमध्ये मत्स्य व्यवसाय विकास विभागाशी सहकार्य आणि समन्वय वाढवण्यात येणार आहे. स्थानिक मच्छीमारांना प्राधान्य देता यावे यादृष्टीने दोन्ही विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असलेली संयुक्त समिती सर्वेक्षण करण्यात येईल , अशी माहिती जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली यावेळी मत्स्य व्यवसाय विकास मंत्री नितेश राणे, आमदार प्रकाश सावंत, प्रधान सचिव रामास्वामी एन, सचिव लाभक्षेत्र विकास प्रकाश मिसाळ, मत्स्य व्यवसाय विकास आयुक्त प्रेरणा देशभ्रतार , जलसंपदा आणि मत्स्य व्यवसाय विकास विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

मंत्री विखे पाटील पुढे म्हणाले या दृष्टीने विभागाने आधीच पावलं टाकले असून उजनी धरणातील मासेमारी विकास साठी प्रक्रिया राबविण्यासाठी सुरुवात केली गेली आहे. मराठवाडा पश्चिम महाराष्ट्र विभागातील अशा धरणांची माहिती देखील एकत्रित केली जाईल या दृष्टीने त्यांनी यावेळी निर्देश दिले.

जलसंपदा मंत्री विखे पाटील म्हणाले जलसंपदा आणि मत्स्यव्यवसाय विकास विभागाच्या वतीने संयुक्तरित्या अशा धरणांच्या माहितीचा सर्वेक्षण आणि विश्लेषण करून कार्यवाही करण्यास गती देण्यात येईल. यासाठी जलसंपदा विभागाच्या चारही मुख्य अभियंता यांना जबाबदारी देण्यात येत असून गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ आणि कृष्णा खोरे विकास महामंडळ यामधील धरणांमध्ये मासेमारीच्या दृष्टीने आवश्यक माहिती एकत्रित केली जाईल.

मत्स्य व्यवसाय विकास मंत्री नितेश राणे म्हणाले, जलसंपदा विभागाशी समन्वय राखण्यासाठी मत्स्य व्यवसाय विकास आयुक्त यांना जबाबदारी देण्यात येत आहे. मत्स्य व्यवसाय विभागाच्या वतीने जवळपास २५०० धरण आणि तलाव यातील मासेमारीसाठी मच्छीमारांच्या सहकारी संस्थांना संधी दिली जाते. विभागाने याबाबत पारदर्शक व आधुनिकता आणण्यासाठी डिजिटायझेशन, मॅपिंग केले गेले आहे आणि रियल टाईम डाटा सर्विसलेन्स प्रणाली कार्यरत केली आहे. जलसंपदा विभागाच्या विविध धरणांमध्ये देखील स्थानिक मच्छीमारांना मासेमारीसाठी संधी मिळावी यादृष्टीने विभाग प्रयत्नशील आहे असे मंत्री श्री राणे म्हणाले.



यासह जलसंपदा विभागाच्या अंतर्गत धरणांमधील गाळ काढण्यासाठी व जल साठवण क्षमता वाढविण्यासाठी कार्यवाही केली जाते त्या मध्ये मत्स्य व्यवसाय विभागाच्या अखत्यारीत असलेल्या धरणातील व तलावातील गाळ काढण्यासाठी देखील सहकार्य मिळावे असे श्री राणे म्हणाले.

यावेळी गोड्या पाण्यातील मासेमारी, सहकारी मच्छीमार संस्था, तलावातील मासेमारीसाठी ठेका पद्धती, दोन्ही विभागांशी संबंधित विविध बाबी, मासेमारीसाठी राबविण्यात येणारी प्रक्रिया आदी विषयाबाबत चर्चा झाली.

# डॉ. विखे पाटील कृषि महाविद्यालय, विळद घाट यांच्यातर्फे शेतकरी मेळाव्याचे आयोजन; तज्ज्ञांचे बहुमूल्य मार्गदर्शन

## वांबोरी येथे खरीप मार्गदर्शनासाठी शेतकरी मेळावा उत्साहात संपन्न

**अहिल्यानगर** (समर्थ गांवकरी)

राहुरी तालुक्यातील वांबोरी येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्न डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या कृषि महाविद्यालय, विळद घाट यांच्या वतीने ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम २०२६-२७ अंतर्गत शेतकरी मेळावाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याते म्हणून मा. श्री. रामहरी मिसाळ (कृषि मंडळ अधिकारी,वांबोरी), मा.श्री. एस. बी. केळकंदे (उपकृषी अधिकारी, वाबोरी), श्री.पी.एस.धांबोरे व श्री. प्रवीण भालेराव (सहाय्यक कृषी अधिकारी, वांबोरी), प्रा. संदिप डमाळे, प्रा.डॉ. दीपिका मावळे (सहाय्यक प्राध्यापक, कृषी महाविद्यालय, विळदघाट) तसेच कृषिमित्र श्री. सोमनाथ तोडमल उपस्थित होते.

कार्यक्रमास कृषी महाविद्यालयाचे कार्यक्रम समन्वयक प्रा. के. एस. दांगडे, तसेच गावातील प्रगतशील शेतकरी श्री गणेश जवरे, श्री. संदीप विधाटे, श्री. युवराज पठारे यांच्यासह अनेक शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना मंडळ कृषी अधिकारी मा. श्री. रामहरी मिसाळ यांनी कृषी विभागाच्या



विविध योजनाची सखोल माहिती देत शेतकऱ्यांच्या विविध समस्यांचे समाधान केले. तसेच प्राध्यापक संदीप डमाळ यांनी डाळिंब पिकातील कीड व रोग यावरील समस्या व त्याचे एकात्मिक व्यवस्थापनावर सखोल मार्गदर्शन केले तसेच प्रा. डॉ. दीपिका मावळे यांनी पिकाची पाण्याची गरज व अचूक सिंचन पद्धती यावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमासाठी माननीय श्री. सुभाषरावजी पाटील साहेब माजी जिल्हा परिषद बांधकाम सभापती, श्री. किरण ससाने सरपंच वांबोरी तसेच डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन, विळद घाट (अहिल्यानगर) चे संचालक (तांत्रिक) प्रा. सुनील कल्हापुरे तसेच कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. सोमेश्वर राऊत यांचे मार्गदर्शन लाभले.

# शिष्यवृत्ती परीक्षेत चैतन्य विद्यालयाचा डंका

## उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत चैतन्य विद्यालयाची नेत्रदीपक कामगिरी

**जुन्नर** (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांचे मार्फतएप्रिल २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (UPS) इयत्ता ७वी चा अंतिम निकाल नुकताच जाहीर झाला.या परीक्षेत ग्राम विकास मंडळ ओतूर संचलित

चैतन्य विद्यालय ओतूरच्या आठ विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत क्रमांक संपादन करून जुन्नर तालुक्यात विद्यालयाचे सर्वाधिक विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक झाल्याची माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रतीक अकोलकर यांनी दिली.

विद्यालयाचे बाह्य परीक्षा विभाग प्रमुख भाऊसाहेब खाडे माहिती देताना म्हणाले की,या परीक्षेत विद्यालयातील ३५ परीक्षार्थींपैकी २२ परीक्षाअर्थी उत्तीर्ण झाले. विद्यालयाचा शेकडा निकाल ६२.८५ इतका लागला असून विद्यालयातील आठ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले आहेत. अतिशय कमी दिवसात विद्यार्थ्यांनी हे यश शिक्षकां च्या मार्गदर्शनामुळे तसेचे विद्यार्थ्यांनी स्वतः घेतलेले कष्ट,मन लावून केलेला अभ्यास,सातत्यपूर्ण सराव, स्वतःवर असलेला विश्वास यामुळे प्राप्त झाले आहे. जिल्हा गुणवत्ता यादीत क्रमांक संपादन करून तालुका गुणवत्ता यादीत सर्वात जास्त विद्यार्थी येण्याचा मान विद्यालयाला प्राप्त झाला आहे.यामुळे विद्यालयाच्या नावलौकिक अधिक वाढला आहे. पुढील तीन वर्ष या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणार आहे. याप्रसंगी सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचा विद्यालयाच्या वतीने

# शेडगाव येथे भव्य रक्तदान शिबिर ५२ रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**श्रीगोंदा** (समर्थ गांवकरी)

श्री संत शिरोमणी सावता महाराज, श्री संत नामदेव महाराज व सद्गुरु ओक बाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त शेडगाव येथे सप्ताह कमिटीच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. सोमवारी (१० ऑगस्ट) श्री दत्त मंदिर सभामंडप, शेडगाव येथे झालेल्या या शिबिरात तब्बल ५२ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

रोटरी ब्लड बँक, दौंड यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिरासाठी दादाभाऊ क्षिसागर, भाऊसाहेब खामकर, बिभीषण राऊत, ज्ञानदेव बेलेकर, डॉ. गिरमे यांच्यासह आयोजक व ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.

रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्याचा आयोजकांच्या वतीने हेल्मेट व प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. माजी सरपंच विजय शेंडे यांच्या हस्ते रक्तदात्यांना हे साहित्य व प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले.



दरम्यान, पुण्यतिथीनिमित्त आयोजित सप्ताहात सात दिवस नामांकित कीर्तनकारांची कीर्तने झाली. दररोज ग्रामस्थांच्या वतीने महाप्रसादाचे नियोजन करण्यात आले. भक्तिमय वातावरणात सुरू असलेल्या सप्ताहाची सांगता काल्याच्या कीर्तनाने झाली.

रक्तदान हे श्रेष्ठ दान असून, एका रक्तदानामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात. हीच खरी ईश्वरसेवा आहे, असा संदेश यावेळी देण्यात आला. रक्तदान शिबिराला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# आशा कार्यकर्त्या व गटप्रवर्तकांचा शहापूर तहसील कार्यालयावर ठिय्या!

**शहापूर** (समर्थ गांवकरी)

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत वर्षानुवर्षे अल्प मानधनावर आरोग्यसेवेचा भार वाहणाऱ्या आशा कार्यकर्त्या व गटप्रवर्तकांनी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी आज शहापूर तहसील कार्यालयावर धडक दिली. महाराष्ट्र राज्य आरोग्य खाते आशा व गटप्रवर्तक संघटनेच्या वतीने केंद्र सरकारच्या चार कामगार संहितांचा निषेध करीत तहसील कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले. यावेळी विविध मागण्यांच्या घोषणा देत शासनाचे लक्ष वेधण्यात आले.

आशा व गटप्रवर्तकांना कंत्राटी पद्धतीतून मुक्त करून कायम स्वरूपी सेवेत सामावून घ्यावे, नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी लागू करावी, प्रलंबित मानधनवाढ व थकीत रक्कम तातडीने द्यावी, तसेच किमान वेतन, ग्रॅच्युइटी,



पेन्शन, भविष्य निर्वाह निधी व विमा यांसारख्या सामाजिक सुरक्षा सुविधा द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली. सेवाकाळात मृत्यू झाल्यास कुटुंबीयांना आर्थिक मदत मिळावी, निवृत्तीचे वय ६५ वर्षे करावे, आरोग्य केंद्रांवरील वाढता कामाचा बोजा लक्षात घेता आशा कार्यकर्त्यांसाठी स्वतंत्र कक्षाची व्यवस्था करावी आणि बायोमेट्रिक हजेरीची सक्ती करू नये, अशीही मागणी संघटनेने केली. गर्भवती महिला तसेच जोखमीच्या माता-बालकांच्या अतिरिक्त जबाबदाऱ्या आशा व गटप्रवर्तकांवर लादू नयेत, रुग्णालयात पोहोचल्यानंतरही त्यांच्यावर अतिरिक्त कामाची जबाबदारी देऊ नये, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली. गटप्रवर्तकांना 'आशा पर्यवेक्षक' असा दर्जा देऊन त्यांच्या मानधनात वाढ करावी, अशीही मागणी करण्यात आली.

वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या मागण्यांकडे शासनाने तातडीने लक्ष देऊन त्यांची पूर्तता न केल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी दिला.

# थोरात कारखाना कार्यस्थळावर अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात

**संगमनेर** (समर्थ गांवकरी)

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सह.साखर कारखाना येथील अमृतेश्वर मंदिर प्रांगणात काँग्रेसचे वरिष्ठ नेते मा.आ.बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवार दि.१३ ऑगस्ट ते गुरुवार २० ऑगस्ट २०२६ या कालावधीत ग्रंथराज ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर व सांस्कृतिक मंडळाचे कार्याध्यक्ष रामदास तांबडे यांनी दिली आहे.

वै.स्वानंद सुखनिवासी गुरुवर्य ह.भ.प रामभाऊ महाराज गावडे यांचे प्रेरणेने व ह.भ.प. गुरुवर्य कलामाई यांचे कृपाशिर्वादाने व ह.भ.प.गोविंद महाराज करंजकर तसेच ह.भ.प.चंद्रलेखाताई काकडे यांचे मार्गदर्शनाखाली सलग ४१ व्या वर्षी या सप्ताहाचे आयोजन होत आहे.

या सप्ताहाची घटस्थापना गुरुवार दि.१३ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वा पांडुरंग घुले व त्यांच्या सुविद्य पत्नी प्रतिभाताई पांडुरंग घुले यांच्या शुभहस्ते होणार आहे. या सप्ताहात सकाळी ५ ते ६ काकड भजन,सकाळी ८ ते ११ ग्रंथराज ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण, सकाळी ११ ते १२ गाथा भजन,सायं.४.३० ते ५.३० सामु.हरिपाठ, सायं.५.३० ते ६.३० ज्ञानेश्वरी प्रवचन,सायं ७ ते ९ हरिकिर्तन नंतर हरिजागर होणार आहे.

यामध्ये गुरुवार दि.१३ ऑगस्ट ते गुरुवार दि.२० ऑगस्ट २०२६ पर्यंत ह.भ.प.हिराबाई जोंधळे (संगमनेर),ह.भ.प.सौ सोनालीताई नरोडे (सायखींडी),ह.भ.प.शशिकलाताई सूर्यवंशी ( संगमनेर ), ह.भ.प.मीनाताई सुपेकर ( घुलेवाडी), ह.भ.प.आशाताई वर्पे (आळंदी), ह.भ.प.अलकाताई मोहटे (आळंदी), ह.भ.प.चंद्रलेखाताई काकडे( संगमनेर) संपूर्ण सप्ताह काळात दररोज ज्ञानेश्वरी अध्याय प्रवचन सेवा देणार आहे.

गुरुवार दि. १३/०८/२०२६ रोजी जयश्रीताई तिकांडे ( राजापूर ), शुक्रवार दि.१४ रोजी ह.भ.प. जगन्नाथ महाराज उंबरकर ( उंबरी ),शनिवार दि.१५ रोजी ह.भ.प. शरद महाराज ढवळे ( काकडवाडी ), रविवार दि.१६ रोजी ह.भ.प.अरुण महाराज फरगडे ( निमगाव पागा ), सोमवार दि.१७ रोजी ह.भ.प.व्यंकटेश महाराज सोनवणे ( निमगाव भोजापूर ) , मंगळवार दि. १८ रोजी गोविंद महाराज करंजकर ( बीड ), बुधवार दि..१९ रोजी सुदाम महाराज कोकणे ( धांदरफळ ) यांचे कीर्तन सेवा होणार होणार असून गुरुवार दि.२०/०८/२०२६ सकाळी ९.






ते ११ कथा प्रवक्ते व कीर्तनकार ह.भ.प पुरुषोत्तम महाराज पाटील ( बुलढाणा ) यांचे काल्याचे कीर्तन व सोहळ्याची सांगता होईल.

दीपोत्सव बुधवार १९/०८/२०२६ रोजी सायं.६.३० कारखान्याचे चेअरमन लोकनेते मा.आमदार बाळासाहेब थोरात व सौ.कांचनताई बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते होणार आहे. असून यावेळी मा.आ. डॉ.सुधीर तांबे, सौ.दुर्गाताई तांबे,आ. सत्यजीत तांबे,इंद्रजितभाऊ थोरात,डॉ. जयश्रीताई थोरात,व्हा.चेअरमन पांडुरंग पा.घुले यांचे सह कारखान्याचे सर्व संचालक मंडळ उपस्थित राहणार आहे.

तरी या कार्यक्रमाचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन सांस्कृतिक मंडळाचे उपाध्यक्ष व कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर,कार्याध्यक्ष,सेक्रेटरी,खजिनदार व सांस्कृतिक मंडळाच्या सर्व संचालकांनी केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# मतदारसंघ पुर्नरचना विधेयकाचा सर्व पक्षांना फायदा : केंद्रीय मंत्री रामदास आठवले

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

अबकड आरक्षण उपवर्गीकरणा मुळे मातंग व बौद्ध समाजात सध्या तेढ निर्माण झाल्यासारखी स्थिती आहे. पण बौद्ध समाजात शिक्षणाचे प्रमाण जास्त असल्याने त्यांना आरक्षणाचा फायदा मिळाला. त्यामुळे मातंग समाजानेही शिक्षणाची कास धरावी तसेच सरकारनेही मातंग समाजाच्या सर्वांगीण विकासाचा आराखडा करावा, असे मत केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केले .

आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते अशोक गायकवाड यांचे निधन झाल्याने त्यांच्या कुटुंबियांच्या सांत्वन करण्यासाठी मंत्री आठवले नगरला आले होते. त्यावेळी विश्रामगृहावर पत्रकारांशी ते बोलत होते. रिपब्लिकन पक्षाचे प्रदेश कार्याध्यक्ष बाबुराव कदम, जिल्हाध्यक्ष सुनील साळवे यांच्यासह हेमंत रणपिसे, राजाभाऊ साळवे, श्रीकांत भालेराव, विजय वाकचौरे, अजय साळवे, किरण दाभाडे, भीमराव बागुल उपस्थित होते.

बौद्ध समाजाला शिक्षणाचे प्रमाणात आरक्षणाचा फायदा होतो. मातंग व अन्य समाजात शिक्षण कमी असल्याने त्यांना आरक्षण मिळत नाही हे जरी खरे असले तरी उद्या आरक्षण उपवर्गीकरण करून त्यांच्यासाठी स्वतंत्र जागा ठेवल्या, पण त्या जागांसाठी आवश्यक पात्रतेचे उमेदवार मिळाले नाही तर त्या जागा रिक्त राहतील. असे होऊ नये म्हणून मातंग समाजानेही शिक्षण प्रवाहात आले पाहिजे व सरकारनेही मातंग समाजाच्या विकासाचा आराखडा राबवला पाहिजे, असे मंत्री आठवले म्हणाले.

महिला आरक्षण व मतदार संघ पुर्नरचना विधेयक संसदेत आणले पाहिजे, त्याचा सर्व पक्षांना फायदा होणार असल्याने त्यांनी त्याला पाठिंबा दिला पाहिजे, असे स्पष्ट करून आठवले म्हणाले, सध्याचे मतदारसंघ आरक्षण २०३४ पर्यंत असले तरी २०२९ पासून लागू होणाऱ्या पुर्नरचनेमध्येही आरक्षण राहणार आहे. प्रत्येक राज्यातील एक तृतीयांश जागा वाढणार आहेत. उत्तर व दक्षिण असा कुठलाही भेदभाव होणार नाही, असा दावा करून आठवले यांनी सर्व राजकीय पक्षांना पाठिंबा देण्याचे आवाहन केले.




ज्येष्ठ नेते शरद पवार २०१९ मध्ये एनडीएमध्ये आले असते तर २०२२ मध्ये ते राष्ट्रपती झाले असते, असा गौप्यस्फोट आठवले यांनी केला. शरद पवार हे एनडीएमध्ये येणार की नाही, हे माहिती नाही असे मंत्री आठवले यांनी यावेळी सांगितले.

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### कवी वारकड यांना राज्यस्तरीय संत ज्ञानेश्वर माऊली संत साहित्य पुरस्कार२०२६ जाहीर

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी) :** प्रेरणादायी वक्ते श्री दत्तात्रय वारकड यांनी आजपावेतो विविध वृत्तपत्रांमधून यांचे लेख प्रकाशित झाले असून आकाशवाणी केंद्रावर त्याची विविध व्याख्याने गाजलेली आहेत.



सध्याच्या नवीन पिढीतील... विद्यार्थ्यांना संताविषयी ज्ञान मिळावे या अनुशंगाने विविध शाळा, कॉलेज येथे जावून ते विद्यार्थ्यांसाठी व्याख्याने आयोजित करत आहेत. या मागे विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी व थोर महापुरूष संत, महंत यांच्या व्यक्तीचरीत्राची ओळख पटावी व विद्यार्थ्यांनी आपल्या व्यक्तीमत्वाचा विकास घडवून आणावा व आपले जीवन सुजलाम सफलम बनवावे हाच मुलभूत हेतु आहे.

आजपर्यंत अहिल्या नगर जिल्हा सह महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यातही १००० पेक्षा अधिक व्याख्यानं त्यांनी दिली आहेत.त्यांचा विषय आहे. संत श्री ज्ञानेश्वर माऊली यांची ज्ञानज्योत अखिल विश्वाला अखंडित महा ऊर्जेचे प्रेरणा स्त्रोत ! त्याचबरोबर आजचा युवक व त्याच्या समोरील आव्हाने, आनंदी जीवन आयुष्याचा आनंद उत्सव व्यक्तिमत्व विकास, अशा विविध विषयावरती समाजामध्ये ते प्रबोधन करतात.त्यांच्या या समाज उपयोगी कार्याची दखल घेत आळंदी,दि.२३ऑगस्ट २०२६ के. एस. आय. पब्लिकेशन्स, कोल्हापूर (मु. पो. इंगळी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर) यांच्या वतीने आळंदी येथे आयोजित ३० वे राज्यस्तरीय साहित्य संमेलन व पुरस्कार सोहळा मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. या संमेलनात विविध साहित्यिक,कवी, लेखक, समीक्षक व साहित्यप्रेमी राज्यभरातून सहभागी होणार आहेत.

### सोनावळे आश्रमशाळेत जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा



**जुन्नर(समर्थ गांवकरी) :** शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा सोनावळे ता:- जुन्नर जि:-पुणे या शाळेत नऊ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिन व क्रांती दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. अशी माहिती शाळेच्या मुख्याध्यापि का श्रीम मंगल गुंड यांनी दिली.जागतिक आदिवासी दिनानिमित्त चार ऑगस्ट ते नऊ ऑगस्ट या कालावधीत जागतिक आदिवासी दिन सप्ताहाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.त्यातचित्रकला स्पर्धा,निबंध स्पर्धा,वकृत्व स्पर्धा,रांगोळी स्पर्धा, भित्त पत्रक स्पर्धा,सांस्कृतिक कार्यक्रम असे विविध उपक्रम घेण्यात आले.

जागतिक आदिवासी दिन कार्यक्रमाची सुरुवात थोर आदिवासी क्रांतिकारक बिरसा मुंडा,राघोजी भांगरे यांच्या प्रतिमा पूजनाने झाली कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोनावळे गावचे सरपंच सुखदेव रावते व प्रमुख अतिथी म्हणून हनुमंत काठे व लहू शेखरे हे उपस्थित होते. इयत्ता सहावी ते बारावीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगता तून आदिवासी संस्कृती, कला याबद्दल माहिती सांगितली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सुंदर असे सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले नऊ ऑगस्ट ते सतरा ऑगस्ट हर घर तिरंगा मोहिमेची सुरुवात ही शाळेत करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नारायण डोळे व आभार प्रदर्शन प्रवीण गाढवे यांनी केले. कार्यक्रमास सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### उस्थळदुमाला येथील ओम श्री साधना कुटीर मध्ये विशाल भंडारा कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद



**नेवासा (समर्थ गांवकरी) :** ब्रम्हलिन महंत प्रकाशगिरीजी महाराज व महंत ओमकारगिरीजी महाराज (हरिद्वार), महंत सुनिलगिरीजी महाराज यांच्या आशिर्वादाने व महंत जगदिशगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली नेवासा तालुक्यातील उस्थळ दुमाला येथील ओम श्री साधना कुटीर आश्रमाच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित वास्तूपूजन व भंडारा कार्यक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ओम श्री साधना कुटीर आश्रमात झालेल्या प्रसंगी पहाटे ४ वाजता ध्वनीपूजा,सकाळी ११ वाजता कन्या पुजन,दुपारी १२ वाजता संत भंडारा कार्यक्रम व रात्री ९ वाजता हरिजागर भजन असे दैनंदिन कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडले. यावेळी श्रीराम साधना आश्रमाचे महंत सुनिलगिरीजी महाराज, त्रिवेणीश्वर देवस्थानचे महंत श्री रमेशानंदगिरीजी महाराज,मध्यमेश्वर देवस्थानचे महंत बालयोगी श्री ऋषिनाथजी महाराज यांच्या हस्ते वास्तू पूजन तर ओम श्री साधना कुटीर आश्रमाचे महंत योगी जगदीशगिरीजी महाराज यांच्या हस्ते आलेल्या संत मंडळींचे संतपूजन व कन्या पूजन करण्यात आले.

# इस्रोच्या श्रीहरीकोटा येथील अंतराळ केंद्रास विद्यार्थ्यांची प्रेरणादायी भेट

## 'केअर फॉर यू' फाउंडेशनच्या ४३ विद्यार्थ्यांना अंतराळ विज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

'केअर फॉर यू' फाउंडेशनच्या वतीने १० ऑगस्ट २०२६ रोजी श्रीहरीकोटा येथील भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) येथे शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले. या भेटीत महाराष्ट्रातील विविध बालसंगोपन संस्थांमधील ४३ विद्यार्थी आणि ३० स्वयंसेवक सहभागी झाले. भारताच्या अंतराळ संशोधनातील प्रगतीचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची ही विद्यार्थ्यांसाठी अविस्मरणीय संधी ठरली.



या पथकासोबत 'केअर फॉर यू' फाउंडेशनचे मुख्य सल्लागार तथा महाराष्ट्र राज्याचे अपर पोलीस महासंचालक (प्रशिक्षण व विशेष पथके) कृष्ण प्रकाश राजमोहन प्रसाद, खझड यांच्या विशेष उपस्थितीमुळे विद्यार्थ्यांना मोठी प्रेरणा मिळाली. यावेळी सीए प्रसाद भंडारी, ॲडव्होकेट कौवल्य कुलकर्णी, सिद्धार्थ गोंगडे, स्मिता सारडा आणि मधुसूदन सारडा आदी मान्यवर उपस्थित होते.

या संपूर्ण भेटीत विद्यार्थ्यांना ज्ञान, संवाद आणि प्रेरणेची अनोखी अनुभूती मिळाली. इस्रोमधील वरिष्ठ अधिकारी व शास्त्रज्ञांशी संवाद साधण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली. भारताच्या अंतराळ मोहिमांमागील मेहनत, अचूकता, शिस्त आणि समर्पण याची माहिती विद्यार्थ्यांना मिळाली.

'इस्रो अध्यक्षांशी ऑनलाइन संवाद'

या भेटीचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे इस्रोचे अध्यक्ष श्री. व्ही. नारायणन यांच्याशी बंगळूर येथून झालेला ऑनलाइन व्हिडिओ संवाद. आपल्या अत्यंत व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढून त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांचा हा संवाद विद्यार्थ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी आणि अविस्मरणीय ठरला.

इस्रोतर्फे करण्यात आलेल्या सर्व व्यवस्थाही अत्यंत प्रशंसनीय होत्या. बस वाहतूक, निवास, भोजन आणि इतर आवश्यक सुविधांची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती.

'प्रक्षेपण केंद्र आणि नियंत्रण कक्षाला भेट'

विद्यार्थ्यांना श्रीहरीकोटा येथील पहिले व दुसरे प्रक्षेपण केंद्र तसेच नियंत्रण कक्षाला भेट देण्याची संधी मिळाली. भारताच्या ऐतिहासिक अंतराळ मोहिमा ज्या ठिकाणाहून पार पडतात, त्या अत्याधुनिक सुविधांची प्रत्यक्ष माहिती मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या ज्ञानात मोठी भर पडली.

'शास्त्रज्ञांशी सविस्तर संवाद'

या भेटीतील विशेष उल्लेखनीय भाग म्हणजे श्री. एन. कुमार, ग्रंथालय अधिकारी-ड, एलआयआरडी/एमएसए, एसडीएससी-शार, इस्रो, श्रीहरीकोटा यांच्याशी झालेला सविस्तर संवाद. त्यांनी अत्यंत शांतपणे आणि सोप्या भाषेत अंतराळ विज्ञानातील अनेक बारकावे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले तसेच त्यांच्या विविध प्रश्नांची उत्तरे दिली.

# राष्ट्रीय हातमाग दिन (विणकर दिन) सरकार तर्फे साजरा व्हावा

## केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांच्याकडे मागणी

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)



राष्ट्रीय हातमाग दिन (विणकर दिन) नगर शहरात शासनाच्या वतीने दरवर्षी साजरा करावा अशी मागणी जागतिक साळी संघटनेचे महेश कांबळे यांनी केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांच्या कडे केली त्यांनी त्यास सकारात्मक प्रतिसाद दिला.

निवेदनात म्हटले आहे कि गेली १० वर्षे हा दिन साजरी केला जात परंतु शहरात एकदा फक्त राष्ट्रीय हातमाग मंडळाने प्रदर्शन घेतले होते पण दरवर्षी तो सार्वजनिक रित्या साजरा होत नाही, राष्ट्रीय हातमाग दिनाचे आयोजन जनतेमध्ये हातमाग उद्योगाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्थेतील त्याचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी केले जाते. याचा उद्देश हातमाग क्षेत्रातील विणकर आणि कारागिरांना सक्षम करणे आहे,जे अनेकदा ग्रामीण आणि निम-ग्रामीण भागातील असतात, ज्यामुळे शाश्वत उपजीविकेला चालना मिळते.हा दिवस भारताच्या स्वदेशी हातमाग उत्पादनांची सांस्कृतिक समृद्धी आणि कलात्मकता अधोरेखित करतो, ग्राहकांना हस्तनिर्मित वस्तू निवडण्यास आणि 'व्होकल फॉर लोकल आणि मेक इन इंडिया उपक्रमांना पाठिंबा देण्यास प्रोत्साहित करतो.

नगर शहरात साळी, कोष्टी, पदंशाली आदी विणकर समाजाची संख्या सुमारे १ लाख आहे तर जिल्ह्यात हि मोठ्या प्रमाणात आहे, त्यासाठी आपल्या समाजकल्याण विभागामार्फत तो राबविला जावा. ७ ऑगस्टला ऐतिहासिक महत्व आहे या दिवशी विदेशी कापडाची होळी करण्यात आली म्हणून मा पंतप्रधान मोदी यांनी हा दिवस राष्ट्रीय हातमाग दिन(विणकर दिन) म्हणून घोषित केला व २०१५ पासून हा दिवस राष्ट्रीय हातमाग दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. विणकरांचे संघटन करून विणकर समाजाच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी यासाठी प्रयत्न केले जावेत.

शहरात राजकारणात व उद्योग व्यवसायात हा समाज पूर्वी आघाडीवर होता.परंतु गेली १५ वर्षात तो मागे पडला आहे या विणकर समाजाला ओबिसि मधून एस बीसी प्रवर्गात टाकण्यात आले विध्यार्थी वर्ग, नोकरदार, नोकरी, बढती , बदली मध्ये अनेकांना फायदे झाले आहेत,तर उद्योगासाठी कर्ज पुरवठा होतो परंतु बँका मंजूर करत नाही ,एसबीसी समाजाला सरकार १ लाख रुपये बिनव्याजी देते,अनेक सवलती आहेत पण समाजाला त्या माहिती होत नाही.समाज बांधवानी अपडेट न राहता व्यवसाय केला.त्यामुळे परंपरागत वस्त्र विणणे हा व्यवसाय बंद पडला, त्याला पुन्हा चांगले दिवस आले आहे व तो नगरमध्ये सुरु करण्यात येणार आहे असेही महेश कांबळे म्हणाले.

# भंडारदऱ्यासाठी १५ व १६ ऑगस्ट रोजी एकेरी वाहतूक

राजूर (समर्थ गांवकरी)

या वर्षी १५ ऑगस्ट शनिवारी येत असून स्वातंत्र्य दिनी सलग सुट्टी जोडून आलेल्या सुट्टया मुळे अनेकांनी पर्यटकांची पंढरी असलेल्या भंडारदरा धरण परिसरात भटकंती करण्यासाठी येत असले मुळे वाहतूकीत बदल करण्यात आहे

१५ ऑगस्टच्या सुट्टीत पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी भंडारदरा धरण, रंधा धबधबा, कोकणकडा, हरिश्चंद्र गड, कळसुबाई शिखर, अमृतेश्वर मंदीर रतनवाडी, या प्रेक्षणीय स्थळी पुणे, नाशिक, ठाणे मुंबई आणि नगर जिल्हयातुन मोठ्या प्रमाणात पर्यटक येत असतात. जोडून सुट्टी आल्याने १५ ऑगस्ट ते १६ ऑगस्ट दरम्यान उपरोक्त प्रेक्षणीय स्थळी पर्यटकांची मोठया प्रमाणात गर्दी होण्याची दाट शक्यता व्यक्त होतेय. त्याचप्रमाणे सध्या पावसामुळे रस्ते मोठ्या प्रमाणात खराब झालेले आहेत. सदर भागातील रस्ते अरुंद असल्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडी होवुन कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये या करीता वाहतुक नियमात बदल

करण्यात आले आहेत. जिल्हयाचे पोलीस अधीक्षक मुमाकां सुदर्शन यांनी तसे आदेश दिले आहेत.

यानुसार रंधा फाटा येथून भंडारदरा येथे जाण्यासाठी प्रवेश बंद करण्यात आला आहे. शेंडी / भंडारदरा येथे जाण्यासाठी वाकी फाटा, वारंघुशी फाटा येथुन प्रवेश असेल. एकेरी वाहतुकीचा मार्ग वारंघुशी फाटा वाकी फाटा - चिचोंडी फाटा यश रिसोर्ट शेंडी भंडारदरा धरण स्पिल्वे गेट भंडारदरा -- गाव - - गुहीरे रंधा मार्गे इच्छित स्थळी जाता येणार आहे. यातून फक्त अत्यावश्यक सेवा म्बुलन्स अग्निशामक दल शासकीय वाहने याना वगळण्यात आले आहे पर्यटकांनी गर्दी बघता नियमावलीचे पालन करणे बंधनकारक असुन वाहने देखील चेक होणार असल्याने मद्यपान करणे किंवा मद्य बाळगू नये असे आवाहन राजूर पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरिक्षक किशोर पवार यांनी केले आहे.



# आळेफाटा बायपास परिसरात कचऱ्याचे साम्राज्य; राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या दुर्लक्षामुळे अपघाताची भीती

आळेफाटा (समर्थ गांवकरी)

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६० (खेड-सिन्नर) वरील आळेफाटा बायपास उड्डाणपुलालगतच्या मोकळ्या जागेत मोठ्या प्रमाणावर कचऱ्याचे ढीग साचले असून परिसरात अस्वच्छता आणि दुर्गंधीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. या ठिकाणी रात्रीच्या वेळी मद्यपींच्या बैठका भरत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून भविष्यात गंभीर अपघात किंवा अनुचित घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.




ग्रामपंचायत सदस्य निशा नवनाथ वाळुंज यांनी सांगितले की, सदर जागेचे सुशोभीकरण करून हरित पट्टा विकसित करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प संचालक, वारजे कार्यालय यांच्याकडे अनेक वेळा लेखी व तोंडी पाठपुरावा करण्यात आला आहे. तसेच ही जागा आमच्या सामाजिक संस्थेकडे सुशोभीकरणासाठी उपलब्ध करून द्यावी किंवा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने स्वतः स्वच्छता व सुशोभीकरणाची कामे तातडीने हाती घ्यावीत, अशी मागणी वारंवार करण्यात आली आहे. मात्र, आजपर्यंत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नाही.

सध्या या परिसरात प्लास्टिक, घरगुती कचरा व इतर टाकाऊ वस्तूंचे ढीग साचल्यामुळे परिसराचे विद्रूपीकरण होत आहे. लावण्यात आलेल्या वृक्षांच्या संवर्धनालाही याचा फटका बसत असून अनेक झाडे मृत झाली असून यामुळे पर्यावरणालाही धोका निर्माण झाला आहे. याशिवाय रात्री मद्यपींचा वावर वाढल्याने महिला, नागरिक आणि वाहनचालकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

स्थानिक नागरिकांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन संपूर्ण परिसराची स्वच्छता, संरक्षक उपाययोजना, सीसीटीव्ही व प्रकाशव्यवस्था तसेच सुशोभीकरणाची कामे त्वरित सुरू करावीत, अशी मागणी केली आहे. अन्यथा नागरिकांच्या वतीने लोकप्रतिनिधी व संबंधित प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# किल्ले शिवनेरी वरसुबाई मंदिर ते आजनावळे परिसरात खड्ड्यांचा साम्राज्य----विद्यार्थ्यांचे व नागरिकांचे सातत्याने अपघात

शिवनेरी (समर्थ गांवकरी)

किल्ले शिवनेरी वरसुबाई मंदिर ते उसरान परिसरात खड्ड्यांचे साम्राज्य झाल्यामुळे विद्यार्थ्यांना व नागरिकांना अपघाताला सामोरे जावे लागत आहे . किल्ले शिवनेरी वरसुबाई मंदिर , सोमतवाडी , बेजवाट , निरगुडे , खानगांव , आपटाळे , चांवड किल्ला ,केळी , माणकेश्वर , तीर्थक्षेत्र कुकडेश्वर , उसरान, आज नावळे पर्यंत मोठ्या प्रमाणात ठिकठिकाणी रस्त्याला खड्डे पडलेले यामुळे महिला वर्ग व ज्येष्ठ नागरिकांना पाय सुद्धा चालता येत नाही .

या परिसरात सातत्याने खड्ड्यामुळे अपघात होतात. या भागातील गरोदर महिला भगिनी व रुग्णांना सरकारी दवाखान्यात किंवा खाजगी दवाखान्यात जाताना खूपच खड्ड्याच्या संकटाला सामोरे जावे लागले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग जुन्नर सातत्याने या रस्त्याकडे दुर्लक्ष करीत आहे . यामुळे नागरिकांना खड्ड्यांमध्ये अपघात होतात . सार्वजनिक बांधकाम विभागातील संबंधित इंजिनियर व संबंधित अधिकारी खड्ड्याबाबत गप्प का ? बसतात याबाबत नागरिकांमध्ये जोरदार चर्चा सुरू आहे.

शेतकरी बांधवांना शेतातील माल नेण्यासाठी खड्ड्यामुळे बाजारपेठेत उशिरा गेल्यामुळे शेतकऱ्यांचा नुकसान होत आहे . या भागात दूध उत्पादक शेतकऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे . सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे खड्ड्याकडे दुर्लक्ष असल्यामुळे दूध उत्पादक संख्या घटनेची शक्यता आहे.

> पर्यटक बांधव , शेतकरी, दूध उत्पादक , विद्यार्थी ,ज्येष्ठ नागरिक व महिलावर्ग किल्ले शिवनेरी वरसुबाई मंदिर ते आजनावळे परिसरातील ठिकाणी पडलेले खड्डे बाबत सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या रस्त्याच्या कामाबद्दल जाहीर नाराजी नागरिक दररोज चर्चा करीत आहे.



पर्यटक बांधव , शेतकरी, दूध उत्पादक , विद्यार्थी ,ज्येष्ठ नागरिक व महिलावर्ग किल्ले शिवनेरी वरसुबाई मंदिर ते आजनावळे परिसरातील ठिकाणी पडलेले खड्डे बाबत सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या रस्त्याच्या कामाबद्दल जाहीर नाराजी नागरिक दररोज चर्चा करीत आहे.